लोकमत

# गांधीजी जनतेचा विचार करणारे नेते

## आनंद मेणसे; शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात व्यक्त केले विचार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महात्मा गांधी यांनी भारतातील राजकीय व सामाजिक परिस्थितीचा सर्वंकष अभ्यास करून भारतीय स्वातंत्र्यलढ्याला अत्यंत विचारपूर्वक व कल्पकतेने कृती कार्यक्रम दिला. लोकसंग्रहाचे दुर्मीळ कसब तर त्यांच्याकडे होतेच; पण या देशातील जनतेच्या भाकरीचा विचार करणारे ते पहिले नेते होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य आनंद मेणसे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग व विदेशी भाषा विभाग यांच्यातर्फे मराठा इतिहास संशोधन केंद्रातर्फे 'गांधी समजून घेताना...' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. नंदा पारेकर होत्या.

प्राचार्य मेणसे म्हणाले, दक्षिण आफ्रिकेमधून १९१५ मध्ये भारतात परतल्यानंतर महात्मा गांधी यांनी गुरु गोपाळ कृष्ण गोखले यांच्या आवाहनानुसार देश समजून घेण्यास प्रारंभ केला. त्यातून या देशातील विदारक सामाजिक वास्तव त्यांच्या ध्यानी आले. त्याच वेळी या देशाला राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य मिळविण्यामधील अडचणीही त्यांच्या लक्षात आल्या. या देशातील सुमारे ८० टक्के जनता शेतकरी आहे. त्यांचे प्रश्न गंभीर आहेत. त्यांना वाचा फोडायला हवी; म्हणून गांधींनी प्रथमत: चंपानेरचा नीळ सत्याग्रह उभारला. या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर संघटन होऊ शकते, हे त्यांनी दाखवून दिले. महात्मा गांधी यांनी अहिंसेच्या मार्गाने आपला लढा उभारला, यालाही तत्कालीन परिस्थिती कारणीभूत होती. एक तर सशस्त्र लढ्यानंतर स्वातंत्र्ययोद्ध्यांना तुरुंगात वीस-तीस वर्षे खितपत पडावे लागणार होते. महत्त्वाचे मनुष्यबळ तुरुंगात जाऊ देणे परवडणारे नव्हते. त्याचप्रमाणे १८५७ च्या लढ्यानंतर ब्रिटिश सरकारने इंडियन आर्म्स ॲक्ट, १८५८ आणला होता. या कायद्यामुळे संपूर्ण देश नि:शस्त्र झाला होता. या परिस्थितीचे भान गांधीजींना होते. त्यामुळेच त्यांनी जनतेला छोटा कार्यक्रम द्यायचा, त्यासाठी मोठी शक्ती लावायची आणि तो कार्यक्रम यशस्वी करायचा, असे धोरण ठेवले. विदेशी भाषा विभागाच्या डॉ. मेघा पानसरे यांनी स्वागत, प्रास्ताविक व परिचय करून दिला. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
9 JAN 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘गांधीजींमुळे स्वातंत्र्यलढ्यास दिशा’

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर,**

‘महात्मा गांधी यांनी भारतातील राजकीय व सामाजिक परिस्थितीचा सर्वंकष अभ्यास करून भारतीय स्वातंत्र्यलढ्याला अत्यंत विचारपूर्वक व कल्पकतेने कृती कार्यक्रम दिला. लोकसंग्रहाचे दुर्मिळ कसब तर त्यांच्याकडे होतेच, पण या देशातील जनतेच्या भाकरीचा विचार करणारा तो पहिला नेता होता,’ असे गौरवोद्गार प्राचार्य आनंद मेणसे यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग व विदेशी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठा इतिहास संशोधन केंद्रात ‘गांधी समजून घेताना’ या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर होत्या.

मेणसे म्हणाले, ‘दक्षिण आफ्रिकेमधून १९१५मध्ये भारतात परतल्यानंतर महात्मा गांधी यांनी गुरू गोपाळकृष्ण गोखले यांच्या आवाहनानुसार देश समजून घेण्यास प्रारंभ केला. त्यातून या देशातील विदारक सामाजिक वास्तव त्यांच्या ध्यानी आले. महात्मा गांधी यांनी अहिंसेच्या मार्गाने आपला लढा उभारला, यालाही तत्कालीन परिस्थिती कारणीभूत होती. व्यापक लोकसहभाग मिळविण्यासाठी गांधीजींचे हे धोरण कमालीचे यशस्वी ठरले.’

एकीकडे राजकीय स्वातंत्र्याच्या संदर्भात टिळकांनी सनातन भूमिका घेतली असताना महात्मा गांधींनी काँग्रेसला सामाजिक भूमिका घेण्यास प्रवृत्त केले. फुले, आंबेडकर यांच्या सामाजिक कार्यक्रमाशी महात्मा गांधी यांचा सामाजिक कार्यक्रम मिळताजुळता होता. देशातील ५० टक्के लोकसंख्या असणाऱ्या महिलांनी स्वातंत्र्यलढ्यात उतरले पाहिजे, असे सांगतानाच अस्पृश्यता निवारणाचा राष्ट्रीय कार्यक्रम त्यांनी घोषित केला.’

डॉ. नंदा पारेकर म्हणाल्या, ‘महात्मा गांधी यांचे विचार व कार्य यांची प्रस्तुतता अजिबात कमी झालेली नाही, उलट वाढलेली आहे. त्यांच्याविषयी बुद्धीभेदी विखार पसरवणाऱ्या विखारी प्रवृत्तींना चपराक देण्यासाठी तरुणांनी गांधी विचार व तत्त्वज्ञानाचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्याची गरज आहे. डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

9 JAN 2018 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठ : २०१८ची दिनदर्शिका-दैनंदिनीचे प्रकाशन, महत्त्वाची छायाचित्रे**

# माजी कुलगुरुंच्या स्मृतींना उजाळा


लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने यंदा आपल्या साऱ्या पूर्वसुरींचे स्मरण करणारी दिनदर्शिका व दैनंदिनी तयार केली आहे. त्या माध्यमातून वर्षभर त्यांच्या कामाच्या स्मृती जागत्या राहतील, अशी भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सोमवारी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाची २०१८ची दिनदर्शिका व दैनंदिनीचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, दिनदर्शिकेच्या माध्यमातून विद्यापीठांस लाभलेल्या सर्व माजी कुलगुरूंचे स्मरण करण्याचा व त्यांच्या स्मृती कायमस्वरुपी जतन करण्याचा प्रयत्न केला आहे. दररोज त्यांचे दर्शन घडत राहिल्याने आपल्याला त्यातून त्यांच्याप्रमाणेच चांगल्या कामाची प्रेरणा मिळत राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, महाराष्ट्र शासनाच्या प्री-आयएएस ट्रेनिंग सेंटरच्या संचालक डॉ. अंजली पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, वृत्तपत्रविद्या अधिविभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, संगणक विभागाच्या संचालक डॉ. स्वाती खराडे, अधिकारी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या सन २०१८च्या दिनदर्शिकेचे प्रकाशनकुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे, अजित चौगुले, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. अंजली पाटील, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. जे. एस. बागी आदी उपस्थित होते.

## अशी आहे दिनदर्शिका...

शिवाजी विद्यापीठाला ५५ वर्षांत एकूण बारा कुलगुरु लाभले. त्यामुळे या बारा कुलगुरुंची पोर्ट्रेट सन २०१८ च्या दिनदर्शिकेमध्ये वापरली आहेत. दैनंदिनीमध्येही दर महिन्याला एक या प्रमाणे ही पोर्ट्रेट वापरली आहेत. मुखपृष्ठावर विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन झाले त्या दिवशीचे (दि. २३ एप्रिल १९७१) छायाचित्र, तसेच विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण झाले, त्या दिवशीचे (दि. १ डिसेंबर १९७४) छायाचित्र वापरले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

9 JAN 2018 सकाळ

# दिनदर्शिकेतून माजी कुलगुरूंचे स्मरण

## डॉ. शिंदे : शिवाजी विद्यापीठाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दिनदर्शिकेच्या प्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. अंजली पाटील, महेश काकडे आदी.**

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाने दिनदर्शिका व दैनंदिनीतून यंदा माजी कुलगुरूंचे स्मरण केले असून, त्यातून त्यांच्या स्मृती जपण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाची २०१८ ची दिनदर्शिका व दैनंदिनीचे प्रकाशन त्यांच्याच हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, "दिनदर्शिकेतून सर्व माजी कुलगुरूंचे स्मरण करण्याचा व त्यांच्या स्मृती कायमस्वरुपी जतन करण्याचा प्रयत्न आहे. त्यांच्या कार्यातून चांगल्या कामाची प्रेरणा मिळत राहील.'' जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी डॉ. शिंदे यांच्या संकल्पनेतून दिनदर्शिका व दैनंदिनी साकार झाली असल्याचे सांगितले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, महाराष्ट्र शासनाच्या प्रि-आयएएस ट्रेनिंग सेंटरच्या संचालक डॉ. अंजली पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, अधिष्ठाता डॉ. पी.एस. पाटील, अधिष्ठाता डॉ. ए.एम. गुरव, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे.एस. बागी, वृत्तपत्रविद्या अधिविभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, संगणक विभागाच्या संचालक डॉ. स्वाती खराडे उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार ते डॉ. देवानंद शिंदे यांच्यापर्यंत एकूण बारा कुलगुरू विद्यापीठाला लाभले. या बारा कुलगुरूंची पोर्ट्रेट दिनदर्शिकेमध्ये वापरण्यात आली आहेत. दैनंदिनीच्या मुखपृष्ठावर विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन झाले, त्या दिवशीचे (२३ एप्रिल १९७१) छायाचित्र तर मलपृष्ठावर विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण झाले, त्या दिवशीचे (१ डिसेंबर १९७४) छायाचित्र वापरण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 JAN 2018
पुढारी

# सामाजिक उपक्रमांचा माहितीपटातून उलगडा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्ताने विद्यापीठाच्या इतिहास विभाग व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यासकेंद्राच्या संयुक्त विद्यमानाने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुलेयांच्याकार्याचापरिचयकरूनदेणारा माहितीपट विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला. या माहितीपटामध्ये सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांनी केलेल्या शिक्षणप्रसाराच्या कामाबरोबरच इतर सामाजिक उपक्रमांचा उलगडा झाला.

सावित्रीबाई या समाजसेविका आणि शिक्षक याव्यतिरिक्त एक कवयित्री आणि लेखिका होत्या. त्यांचे लिखाण आणि त्याचा आजच्या समाज व्यवस्थेशी असणारा संबंध यावर डॉ. नंदा पारेकर, अविनाश भाले आणि डॉ. निलीशा देसाई यांनी माहितीपटानंतर साधन व्यक्ती म्हणून उपस्थितांशी चर्चा केली.

यावेळी दत्तात्रय मचाले, प्रशांत पाटील, शरद पाटील तसेच इतिहास विभाग व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यासकेंद्रातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 9 JAN 2018
Times of India

# SUK to hold programme for scholars

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University will hold a 15-day capacity building programme in social science for research scholars and teachers from February 5.

A Shivaji University, Kolhapur (SUK) official said the workshop will continue till February 20 at the university campus. The programme is being held for scholars belonging to the scheduled caste (SC), scheduled tribe (ST), Other Backward Caste (OBC) and minority communities.

The use of computers in data analysis and interpretation is one of the main purposes of the programme.

The official said only 30 seats are available for the course and only registered PhD students of any recognised Indian university/research institute in any branch of social sciences can apply for this workshop. Accommodation will be provided to all the outstation participants at the SUK guest house.

According to an official, tThe deadline to send in the application for the programme is January 25 and the selection will be done by January 28.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 JAN 2018
Times of India

# 10 short-term courses on offer

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University-Indo-German Tool Room (IGTR) Advanced Technology Training Centre is offering more than 10 short term courses (STCs), a circular released by the university says.

AN official said Autocad, solid works, Catia, VLSI, embedded systems, CNC programming, and PLC programming, among other courses, are available at the centre.

## SUK TECH CENTRE

The circular says that and registration for these courses are on. Students with diploma or degree in the eligible stream can apply for the courses, which will commence from January second week.

The course fee varies from Rs 4,500 to Rs 9,000 for different branches and so is the duration of courses, the circular adds.

A university official said that initially the courses could be started at the internet unit of the main library of the university, while the permanent location gets ready.

The official said that IGTR Aurangabad is an ISO-certified tool room and training centre, which was established in 1990 and is the symbol of Indo-German co-operation aimed at promoting purposeful technical education for the youth in India. The presence of IGTR centre gives the SUK a chance to develop skilled manpower.

The official said Kolhapur being the foundry hub, manufacturers from here are supplying automobile components across the globe, but are unable to sustain the margins which are declining due to lack of value addition. The training centre will help provide value addition, along with skilled manpower.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 JAN 2018
लोकमत

# आय.सी.एस.एस.आर.तर्फे फेब्रुवारीत कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागात भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, नवी दिल्ली (आय.सी.एस.एस.आर.) यांनी मान्यता दिलेल्या क्षमता बांधणी कार्यक्रमांतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक समाजातील प्रशिक्षणार्थींसाठी पंधरा दिवसांची कार्यशाळा फेब्रुवारीमध्ये घेण्यात येणार असल्याची माहिती कोर्स डायरेक्टर डॉ. जगन कराडे यांनी दिली आहे.

समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, येथे ५ ते २० फेब्रुवारी यादरम्यान ही कार्यशाळा होणार आहे. या अभ्यासक्रमासाठी केवळ ३० जागा उपलब्ध आहेत. सहभागी विद्यार्थ्यांना मोफत निवास सुविधा मिळेल. इच्छुक उमेदवार अर्ज www.unishivaji.ac.in या वेबसाइटवरून डाऊनलोड करता येईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 JAN 2018
लोकमत



पी. एस. कांबळे



विशाल ओव्हाळ

# कांबळे, ओव्हाळ यांना दांडेकर पुरस्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषद यांच्यावतीने उत्तम संशोधन शोधनिबंधासाठी दिला जाणारा मानाचा डॉ. व्ही. एम. दांडेकर पुरस्कार शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे व यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. विशाल विष्णू ओव्हाळ यांना प्राप्त झाला. शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे २८ वे वार्षिक अधिवेशन 'सहकार : काल, आज आणि उद्या व पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील यांचे सहकारातील योगदान' या विषयांवर पार पडले. क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल (ता. पलूस) येथे दि. ५ ते ६ जानेवारीला झालेल्या दोन दिवसीय परिषदेमध्ये प्रा. डॉ. पी. एस. कांबळे व डॉ. विशाल ओव्हाळ यांनी सादर केलेला शोधनिबंध सर्वोत्कृष्ट ठरला. या परिषदेमध्ये एकूण ४० शोधनिबंधांचे वाचन करण्यात आले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 JAN 2018
लोकमत

# राजेंद्र खामकर नेट उत्तीर्ण



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय (ज्ञानस्रोत केंद्र) येथील वरिष्ठ ग्रंथालय सहायक डॉ. राजेंद्र धोंडिबा खामकर 'ग्रंथालय व माहितीशास्त्र' या विषयातून नेट परीक्षा उत्तीर्ण झाले. सीबीएसई - यूजीसीमार्फत ही परीक्षा घेण्यात आली होती. त्यांना सन २०१५ ला शिवाजी विद्यापीठाची या विषयातील पीएच.डी. मिळाली आहे. त्यासाठी त्यांना नवी दिल्ली येथील 'आयसीएसएसआर' यांची राष्ट्रीय फेलोशिप मिळाली होती.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 JAN 2018
तरुण भारत


# काशिनाथ गडदे नेट उत्तीर्ण

**कोल्हापूर :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पात्रता चाचणी (नेट) परीक्षेत काशिनाथ गडदे यांनी यश प्राप्त केले आहे. ते शिक्षणशास्त्र या विषयातून सेट आणि नेट दोन्ही उत्तीर्ण असून समाजशास्त्र या विषयात सेट परीक्षेत यश मिळवले आहे. सध्या ते शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागत डॉ. जगन कराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी करत आहेतै. त्यांना प्राध्यापक, कुटुंबिय आणि मित्रपरीवारचे सहकार्य लाभले आहे.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 JAN 2018
तरुण भारत

# कुस्ती स्पर्धेत प्रतापला कास्य



**कोल्हापूर** : रोहटक (हरियाणा) येथे नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ग्रिकोरोमन कुस्ती स्पर्धेत शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या प्रताप पाटीलने कास्य पदक मिळवले. शिवाजी विद्यापीठ संघाद्वारे ६३ किलो वजन गटातून तो स्पर्धेत उतरला होता. स्पर्धेतील धवल कामगिरीबद्दल त्याचा शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. संस्था सचिव विजय बोंद्रे यांच्या हस्ते त्याने सत्कार स्वीकारला. यावेळी संस्थेचे चेअरमन मानसिंग गायकवाड, जिमखाना प्रमुख प्रा. प्रशांत पाटील, प्रबंधक रवींद्र भोसले व अधीक्षक मनीष भोसले आदी उपस्थित होते.

9 JAN 2018 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आता आवडीने खा हेल्दी 'शेपू' : कुलकर्णी

## पौष्टिक खाकऱ्याचा पर्याय : 'सायबर'मधील प्रा. श्रद्धा कुलकर्णी यांचे संशोधन


संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : हेल्दी (आरोग्यदायी) असूनही केवळ उग्र वासामुळे शेपू या भाजीला अनेकजण नाक मुरडतात. मात्र, आता त्यांना 'शेपू'ची भाजी खाकऱ्याच्या स्वरूपात खाता येणार आहे. कोल्हापुरातील श्रद्धा कुलकर्णी यांनी संशोधनातून पौष्टिक खाकऱ्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे.

येथील छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्च (सायबर) ट्रस्टच्या कॉलेज ऑफ नॉन-कन्व्हेन्शियल व्होकेशनल कोर्सस फॉर वुमेनमध्ये सहायक प्राध्यापिकापदी कुलकर्णी कार्यरत आहेत. या महाविद्यालयातील फूड टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट विभागात पोषणशास्त्र (न्यूट्रिशन) विषय त्या शिकवितात. बदलत्या जीवनशैलीनुसार लोकांमधील आहाराबद्दलची जागरूकता वाढत आहे. संपूर्ण आरोग्य अनुभविण्यासाठी पौष्टिक पदार्थांकडे कल वाढत चालला आहे. त्यानुसार सर्व पोषणमूल्ये मिळतील असा खाकरा हा पदार्थ सहायक प्राध्यापिका कुलकर्णी यांनी सहा महिन्यांच्या संशोधनातून तयार केला आहे.

त्यांनी हे संशोधन डिसेंबर २०१७ मध्ये झालेल्या शिवाजी विद्यापीठातील आविष्कार संशोधन महोत्सवात पहिल्यांदा सादर केले. खाकरा हा गुजरातमधील प्रसिद्ध पदार्थ असला, तरी महाराष्ट्रातही तो आवडीने खाण्यात येतो. खाकरा हा साधारणतः गव्हाचे पीठ वापरून केला जातो.

### खाण्यास पौष्टिक



श्वसनाचे विकार कमी करणे, महिलांच्या मासिक धर्माचे नियमन, हाडांचे आरोग्य, रोगप्रतिकारक्षमता वाढविणे, आदींबाबत शेपू उपयुक्त ठरणार आहे. मात्र, केवळ शेपूचा उग्र वास येत असल्याने तिचे सेवन करणे अनेकजण टाळतात. आरोग्यदृष्ट्या पौष्टिक असणाऱ्या या शेपूचे सेवन वाढावे, या उद्देशातून शेपूच्या वापरातून खाकरा तयार केला असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, सहा महिन्यांच्या संशोधनातून हा खाकरा साकारला आहे. यातील काही संशोधनासाठी माझ्या विद्यार्थिनींचीही मदत झाली. शेपू आणि गहू, बाजरी व बेसनाचे पीठ, आले, लसूण, मिरची पेस्ट व मीठ एकत्र करून नेहमीप्रमाणे हा पौष्टिक खाकरा तयार करावा. या खाकऱ्यातून शरीरासाठी उपयुक्त असणारी प्रथिने, कॅलरी (ऊर्जा), फायबर, कॅल्शिअम, फॉस्फरस आणि लोह चांगल्या प्रमाणात मिळते. हवाबंद डब्यात ठेवल्यास हा खाकरा एक महिना टिकतो.

मात्र, शेपूपासून बनविलेल्या खाकऱ्यामध्ये गव्हाच्या पिठासह बाजरी, बेसनाचे पीठही वापरले आहे. बाजरीमध्ये तंतुमय पदार्थांचे प्रमाण अधिक असते. गव्हातून ऊर्जा, प्रथिने तसेच बेसनमधूनही चांगले प्रथिने मिळतात. त्यामुळे हा खाकरा पौष्टिक ठरणारा आहे.